प्रकरण – **12**

अनुदान / आर्थिक सहाय्य जशासारखे संस्कारक्षम कार्यक्रम

रुग्णालयाचा गरीब धर्मादाय निधी आहे. या फंडातून गरजू लोकांना सूचीवर उपलब्ध नसलेली औषधे उपलब्ध करुन दिली जातात. काही विशेष चाचण्या ज्या इतर हॉस्पिटलमध्ये कराव्या लागतात. त्यासाठी लागणारा पैसा धर्मादाय निधीतून वापरला जातो.

## <u>हॉस्पिटलकडून देण्यात येणा-या मोफत सुविधा</u> :-

जे गरीब रुग्ण दारिद्रय रेषेखालील असतील आणि कोणत्याही प्रकारच्या चाचण्या किंवा औषधे खरेदी करण्यासाठी ज्यांची आर्थिक कुवत नसेल त्यांनी समाज विकास अधिकारी यांना एका कागदावर अर्ज करुन व सोबत केसपेपरची झेरॉक्स जोडून कागदपत्रे सादर करावी त्यानंतर समाज विकास अधिकारी सदर रूग्णाची व त्याचे नातेवाईकांची विचारपूस करून सदरचा अर्ज आपल्या अभिप्रायासह अंतिम मंजूरीसाठी प्रमुख वैद्यकिय अधिकारी यांचेकडे सादर करतो. यासाठी साधारणपणे एक दिवसाचा अवधि लागतो.

आवश्यक असणारे औषधे हॉस्पिटलकडून खरेदी करून रूग्णाला दिले जाते. कोणत्याही प्रायव्हेट चाचणीसाठी हॉस्पिटल फी भरणा करते.